Please Consider the Environment Before Printing…

Date: 05/06/2025

# Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

# दिनविशेष

## श्रेष्ठ साहित्यिक, संगीतरचनाकार गोविंदराव टेंबे



गोविंदराव सदाशिव टेंबे हे प्रख्यात महाराष्ट्रीय हार्मोनियमवादक, संगीतरचनाकार, गायकनट व साहित्यिक होते. त्यांचा जन्म ५ जून १८८१ रोजी कोल्हापूरमधील सांगवडे येथे झाला. गोविंदरावांनी कोल्हापूर येथेच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण घेतले व काही वर्षे सनदी वकिली केली. गायनाच्या कार्यक्रमात जाऊन त्यांना संवादिनी (हार्मोनियम) या वाद्याची आवड निर्माण झाली. प्रत्यक्ष या वाद्यवादनाचे रितसर शिक्षण त्यांनी घेतले नव्हते; मात्र स्वप्रयत्नाने त्यांनी या वादनात प्रावीण्य मिळवले. गोविंदराव भास्करबुवा बखले यांच्या साथीला असायचे आणि बहुतेक वेळा संवादिनीचा एकपात्री प्रयोगही करायचे. ते बर्कतुल्ला सितारिये यांचे गंडाबंद शागीर्द होते.

१९११-१३ या काळात त्यांनी 'किर्लोस्कर नाटक मंडळी'त प्रमुख गायकनट म्हणून काम केले. पुढे १९१३-१५ या दरम्यान 'गंधर्व नाटक मंडळी'त सुरुवातीचे भागीदार व नट म्हणून त्यांनी काम केले. १९१७ मध्ये त्यांनी स्वत:च्या 'शिवराज नाटक मंडळी' या संगीत नाटक मंडळीची स्थापना केली. यासाठी त्यांनी नवी नाटके लिहिली, पदे रचली आणि संगीतही दिले. 'धैर्यधर' (मानापमान), 'कच' (विद्याहरण), 'चारूदत्त' (मृच्छकटिक) या त्यांच्या काही प्रमुख गाजलेल्या भूमिका. त्यांनी मानपमान या नाटकास संगीतही दिले. नाटकास संगीत देण्याच्या निमित्ताने त्यांनी रागदारी संगीत, ठुमरी बाज इत्यादी पहिल्यांदाच संगीत रंगभूमीवर आणले. १९३० च्या सुमारास त्यांनी चित्रपटसृष्टीमध्ये पदार्पण केले आणि प्रभात, इंपीरियल, ईस्ट इंडिया, मिनर्व्हा, नटराज इ. संस्थांच्या चित्रपटांमध्ये प्रमुख भूमिका केल्या, तसेच संवादलेखन, गीतरचना व संगीतदिग्दर्शन या क्षेत्रांतही प्रशंसनीय कामगिरी केली. अशा या श्रेष्ठ साहित्यिकाचे ९ ऑक्टोबर १९५५ रोजी निधन झाले.

Nashik Edition

Jun 05, 2025 Page No. 4

Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON * YEOLA DIST. NASHIK * CENTRAL LIBRARY

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401